नि.फौ.ख.क्र.७९२/२०२१
शासन–वि–अरुण वगैरे
नि.क्र.५२

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.६ ची सरतपासणी– सरकारी वकील श्रीमती ज्योती लकडे यांच्या मार्फत.**

मी शपथेवर खरे सांगतो की,

माझे नांव – परवेज खान अलीम खान पठाण
वय अंदाजे ५५ वर्ष, कामधंदा– पोलीस उपनिरिक्षक
राहणार– उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, वर्धा, तह. जि. वर्धा.

..........................................................................................................

१. दिनांक १०.०९.२०२१ रोजी मी पोलीस स्टेशन देवळी येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. प्रस्तूत प्रकरणाचा तपास मी केलेला आहे. या प्रकरणात मला फिर्यादीचे बयाण, छापील प्रथम खबर व वैद्यकीय कागदपत्रे प्राप्त झाले होते. मी चनाटाकळी येथील फिर्यादीच्या घरासमोर घटनास्थळी जावून दोन पंचांना सूचनापत्र देवून त्यांच्या घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. मला आता सूचनापत्र जे दाखविले. त्यावर माझी व पंचांच्या सहया आहेत. त्यास **नि.क्र.५३** देण्यात येते. पंचनामा मला जो दाखविला तो तोच असून, त्यावर माझी व दोन पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५४** देण्यात येते. त्यानंतर मी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. साक्षीदार क्र.५ महादेव याचे बयाण त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. मी आरोपींना ताब्यात घेवून त्यांना सूचनापत्रावर सोडले. मला आता सूचनापत्र दाखविले. त्यावर माझी स्वाक्षरी असून, त्यांना अनुक्रमे **नि.क्र.५५ व ५६** देण्यात येते.

२. मी पंचांसमक्ष आरोपी क्र.२ कडून लोखंडी विळा जप्त केला होता. त्यासंबंधीचे सूचनापत्र **नि.क्र.५७** वर आहे. जप्ती पंचनामा जो मला दाखविला त्यातील मजकूर खरा असून, त्यांवर माझी, पंचांच्या व आरोपीची स्वाक्षरी आहे. त्यास **नि.क्र.५८** देण्यात येते. मी तो विळा ओळखू शकतो. विळा (जी.पी.क्र.०३/२४) जो मला दाखविला, तो तोच असून, तो आर्टीकल **'अ'** वर आहे. वैद्यकीय अधिकारी यांना पत्र पाठवून जप्त विळयाची पडताळणी करण्याची विनंती

केली. त्यासंबंधीचे पत्र **नि.क्र.५९** वर आहे. त्यासंबंधीचा क्युरी रिपोर्ट अहवाल **नि.क्र.६०** वर आहे. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की आरोपी क्र.१ व २ ने सामायीक उद्देशाने फिर्यादीस विळयाने मारुन जखमी केले. तपासाअंती मी न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले. आज आरोपी न्यायालयात हजर आहे.

आरोपींतर्फे – श्री.यु.पी.काशिकर विधीज्ञ यांचेमार्फत उलट तपास

३. जप्ती करतेवेळी मी विळयाला सील केले होते. परंतु जप्ती पंचनाम्यात तसे लिहिलेले नाही. (सरकारी वकीलांनी यावर आक्षेप घेत न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिले की जप्ती पंचनाम्यावर जप्त मुद्देमाल मोहोरबंद केल्याचे लिहिले आहे.) जप्ती पंचनाम्यात कोणती मोहोर लावण्यात आली होती याचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे आहे की जप्त मुद्देमाल पोलीस स्टेशनच्या मालखान्यात ठेवल्या जातो आणि त्यासंबंधीचे रजिस्टर असते. मुद्देमाल जमा करणे आणि पोलीस स्टेशनबाहेर नेणे यासंबंधी नोंद त्या रजिस्टरमध्ये असते. हे म्हणणे खरे आहे की त्यासंबंधीची नोंद मी अभिलेखावर दाखल केलेली नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या आजूबाजूला बरीच घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी शेजा–यांचे बयाण नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी साक्षीदारांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मी घटनास्थळ पंचनामा पोलीस स्टेशनला तयार केला, त्यावर पंचांची स्वाक्षरी पोलीस स्टेशनलाच घेतली. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीविरुध्द खोटे दोषारोप पत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेरतपास नाही.

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्वीक्रुती | माझे समक्ष |
| GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE — Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Date: 2025.10.15 17:41:14 +0530 | GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE — Digitally signed by GAURI VIRENDRA JANGDE DESHPANDE Date: 2025.10.15 17:41:19 +0530 |
| (जी.व्ही.जांगडे–देशपांडे) | (जी.व्ही.जांगडे–देशपांडे) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, | मुख्य न्यायदंडाधिकारी, |
| वर्धा, दिनांक १५–१०–२०२५ | वर्धा, दिनांक १५–१०–२०२५ |